# मला रुग्ण हक्क माहिती आहेत, तुम्हाला?



**चांगली आरोग्यसेवा मिळावी, डॉक्टर व रुग्ण यांच्यातील संबंध चांगले व्हावे यासाठी हॉस्पिटलमध्ये रुग्ण-हक्क व रुग्णांच्या जबाबादाऱ्या पाळल्या जाव्यात...**

## रुग्णांचे हक्क



- जखमी रुग्णाला जीवरक्षक प्रथमोपचार मिळायला पाहिजे.
- रुग्णाला त्याचा आजार व उपचार याबद्दल माहिती मिळायला पाहिजे.
- पुरेशी माहिती देणारे डिस्चार्ज कार्ड मिळायला पाहिजे.
- हॉस्पिटलमधील प्रमुख सेवांचे दरपत्रक मिळायला पाहिजे.
- शस्त्रक्रिया किंवा धोक्याच्या उपचाराआधी त्याबाबत पुरेशी माहिती देऊन रुग्णाची संमती घेतली पाहिजे.
- रुग्णाकडून डॉक्टरांना मिळालेली माहिती गोपनीय राहिली पाहिजे.
- रुग्णाला सेकंड-ओपिनियन (दुसऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांचे मत) घेता आले पाहिजे.
- रुग्णाची मानवी प्रतिष्ठा व खाजगीपणा जपला गेला पाहिजे.
- एच्.आय.व्ही.सह जगणाऱ्या रुग्णाला भेदभावरहित उपचार मिळायला पाहिजे.
- उपचारात पर्याय उपलब्ध असल्यास रुग्णाला स्वतःच्या जबाबदारीवर पर्याय निवडता आला पाहिजे.
- हॉस्पिटलमध्ये सूचना देण्याची व तक्रार निवारण्याची व्यवस्था असली पाहिजे.
- रुग्णावर संशोधन होणार असेल तर त्याबाबतची नैतिक तत्त्वे अधिकृत शासकीय धोरणाप्रमाणे पाळली पाहिजेत.
- सरकारी मदत मिळणाऱ्या धर्मादाय (ट्रस्ट) हॉस्पिटलमध्ये गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना अनुक्रमे मोफत व सवलतीच्या दरात उपचारासाठी एकूण २० टक्के खाटा राखीव असल्या पाहिजेत.







## रुग्णांच्या जबाबदाऱ्या



- आपल्या आरोग्यासंबंधी सर्व माहिती डॉक्टरांना सांगितली पाहिजे.
- तपासणी व उपचार यामध्ये डॉक्टरांना सहकार्य केले पाहिजे. डॉक्टरांच्या सूचना पाळल्या पाहिजेत.
- डॉक्टर व हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांची प्रतिष्ठा आणि हक्क यांचा सन्मान केला पाहिजे.
- डॉक्टरांची ठरलेली फी, हॉस्पिटलचे बिल वेळेवर भरले पाहिजे.
- कितीही राग आला तरी हिंसेचा अवलंब न करणे.

*रुग्ण हक्कांचा प्रचार-प्रसार करू या! रुग्ण हक्कांसाठी संघटित होऊन संवाद करू या!!*


**रुग्ण-हक्क समितीकरिता** साथी द्वारा प्रकाशित



फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस, प्लॉट नं. १४०, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११ ०२९,
दूरध्वनी क्रमांक - २५४५१४१३, २५४५२३२५